# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर; विविध विकासकामांचा करणार प्रारंभ,
2. देशातील सर्वात मोठ्या वाढवण बंदराची पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी,
3. 2024मध्ये भारताच्या विकासदरात 7 पूर्णांक 2 शतांश टक्क्यांपर्यंत वाढीचा मूडीजचा अंदाज,
4. अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाचे मुंबई, सोलापूरसह देशभरात दहा ठिकाणी छापे, आणि
5. पॅरिस पॅराऑलिम्पिकमध्ये भारताच्या शीतलदेवी आणि राकेशकुमार यांचा मिश्र तिरंदाजी प्रकारात नवा विक्रम.

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असून मुंबई आणि पालघरमध्ये त्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम होणार आहेत. सकाळी मुंबईत जागतिक अर्थतांत्रिक महोत्सवात पंतप्रधानांचं भाषण होणार आहे. त्यानंतर दुपारी पालघर इथं पंतप्रधानांच्या हस्ते वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ होईल. तसंच अन्य विकासप्रकल्पांचा पायाभरणी समारंभ आणि उद्घाटनही होणार आहे. वाढवण इथं देशातलं सर्वात मोठं आणि समुद्रात अधिक खोलवर असलेलं बंदर बांधण्यात येत आहे. या बंदरात अतीविशाल मालवाहतूक जहाजं उभारणं शक्य होईल आणि त्यामुळे देशाच्या सागरी व्यापाराला आणि पर्यायानं अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना मिळेल. पंतप्रधानांच्या हस्ते 218 मत्स्यव्यवसाय प्रकल्पांचंही उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे. यातून पाच लाखांहून अधिक रोजगारनिर्मितीची अपेक्षा आहे.

**<u>वाढवण बंदर-सोनोवाल</u>**

वाढवण बंदरामुळे राज्याची आणि देशाची एक वेगळी ओळख जगात निर्माण होईल, असा विश्वास केंद्रिय जहाजबांधणी, बंदर आणि जलमार्गमंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी व्यक्त केला आहे. ते काल पालघर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. हे जगातल्या सर्वोत्तम 10 बंदरांपैकी एक असेल. या बंदरामुळे आंतरराष्ट्रीय सागरी मार्गांशी भारत थेट जोडला जाईल, वेळ आणि पैशांची बचत होईल, तसंच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मिळून सुमारे 12 लाख रोजगारनिर्मिती होईल, असं सोनोवाल म्हणाले.

**<u>मूडीज</u>**

मूडीज रेटिंग्ज या आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थेनं 2024 या आर्थिक वर्षासाठी भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर 6 पूर्णांक 8 दशांश टक्क्यांवरून 7 पूर्णांक 2 शतांश टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तवला असून भारतासाठी सकल देशांतर्गत उत्पन्नही वाढण्याचा अंदाज वाढवला आहे. त्यानुसार 2025 साठी हा विकासदराचा अंदाज 6 पूर्णांक 4 टक्क्यांवरून 6 पूर्णांक 6 टक्क्यांवर गेला आहे. व्यापार क्षेत्रातील सुधारलेली परिस्थिती आणि व्यापक, विकासानुकूल देशांतर्गत खरेदी व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर हा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**<u>शी-बॉक्स पोर्टल</u>**

कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता मिळावी यासाठी सरकारनं शी-बॉक्स पोर्टल सुरू केलं आहे. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते काल नवी दिल्ली इथं या पोर्टलचं उद्घाटन करण्यात आलं. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारी नोंदविण्यासाठी आणि त्यावर देखरेख ठेवण्यासाठी शी-बॉक्स पोर्टल हे एक केंद्रीकृत व्यासपीठ

असून त्याद्वारे तक्रारी दाखल करणं, त्यांची वेगवेगळ्या टप्प्यांवर काय स्थिति आहे, याची शहानिशा करणं आणि अंतर्गत समित्यांद्वारे तक्रारींच्या निपटाऱ्यांसाठी कालबद्ध प्रक्रिया सुनिश्चित करणं इत्यादी सुविधा उपलब्ध होणार आहेत. या प्रसंगी बोलताना महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींचं निराकरण करण्यासाठी अधिक कार्यक्षम आणि सुरक्षित व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं हा उपक्रम म्हणजे एक महत्त्वाचे पाऊल आहे. देशात महिलांसाठी कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. पोर्टलच्या मदतीने वैयक्तिक माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध न होता सुरक्षितपणे तक्रारी नोंदविता येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<u>भाजप-निवडणूक समिती</u>**

भारतीय जनता पार्टीच्या निवडणूक विषयक केंद्रीय समितीची बैठक नवी दिल्लीतल्या पक्षाच्या मुख्यालयात काल संध्याकाळी झाली. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष जेपी नड्डा, पक्षाचे हरियाणा निवडणूक प्रभारी आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यासह पक्षाचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते. आगामी हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी ही बैठक झाली. दरम्यान, काल दुपारीसुद्धा भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांच्या निवासस्थानी भाजपच्या हरयाणा गाभा समितीची बैठक झाली.

**<u>कोळसा रेल्वे</u>**

कोळसा मंत्रालयानं कोळसा वितरण व्यवस्थापन योजनेंतर्गत 38 प्राथमिक रेल्वे प्रकल्पांना प्राधान्य देण्याचं निश्चित केलं आहे. रेल्वे मंत्रालयाच्या समन्वयानं हे प्रकल्प जलदगतीने पूर्ण केले जातील. रेल्वेची दळणवळण व्यवस्था सुधारण, कोळसा पुरवठा वेळेवर होईल या दृष्टिनं प्रयत्न करणे, वितरण व्यवस्थापनावरचा खर्च कमी करणे आणि देशांतर्गत कोळसा वाहतुकीची एकूण कार्यक्षमता वाढवणे हे या प्रकल्पाचं प्राथमिक उद्दीष्ट आहे. सरकारनं या प्रकल्पांपैकी, ओडिशातील दोन महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांना नुकतीच मंजुरी दिली आहे. सरदेगा-भालुमुडा दुहेरी मार्ग प्रकल्पामुळे महानदी कोळसा खाण आणि अनेक खाजगी खाणींमधला कोळसा वितरण वाहतूक सुलभ होईल. तसंच बारगड रोड-नवापारा रोड प्रकल्पामुळे तालचेर कोळसा खाणीमधल्या कोळशाच्या वाहतूक वितरण व्यवस्था सक्षम होण्यास मदत होईल.

**<u>छापे</u>**

सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीनं आखाती देशांतून कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्कर जसमीत हकीमजादा प्रकरणी काल देशभरात दिल्ली, अमृतसर, जालंधर, मुंबई, सोलापूर आणि इंदूर अशा दहा ठिकाणी छापे टाकले. अमेरिकेच्या फॉरेन नार्कोटिक्स किंगपिन डेजिगेशन ॲक्टअंतर्गत 'महत्त्वपूर्ण परदेशी अंमली पदार्थ तस्कर' म्हणूनही त्याची नोंद आहे. पी एम एल ए कायद्यातील तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली. दुबईत राहणारा जसमीत भारतात अंमली पदार्थांचा व्यापार चालवत असल्याचं ईडीच्या तपासात निष्पन्न झालं आहे.

टेनिस

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेमध्ये रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एब्डेन या भारतीय-ऑस्ट्रेलियन जोडीनं पुरुष दुहेरीच्या पहिल्या सामन्यात रॉबिन हासे आणि सँडर अरेंड्स या नेदरलँड्सच्या जोडीचा 6-3, 7-5 असा पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारतीय-ऑस्ट्रेलियन जोडीचा सामना आज दुसऱ्या फेरीत आर. कार्बालेस आणि एफ. कोरिया यांच्याशी होणार आहे. मिश्र दुहेरीत रोहन बोपण्णा आणि इंडोनेशियाच्या अल्डिला सुतजियादी यांच्यात लढत होणार आहे. पुरुष दुहेरीत भारताच्या एन. श्रीराम बालाजी आणि युकी भांबरी यांनी आपापल्या जोडीदारासह दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. बालाजी आणि अर्जेंटिनाच्या गुइडो आंद्रेओझी जोडीने न्यूझीलंडच्या मार्कस डॅनियल आणि मेक्सिकोच्या मिगुएल रेयेस-वरेला जोडीवर 5-7, 6-1, 7-6 (12-6) अशी मात केली. भांबरी आणि फ्रान्सची जोडीदार अल्बानो ऑलिव्हेटी यांनी स्थानिक वाइल्डकार्ड रायन सेगजर्मन आणि पॅट्रिक थ्रॅक यांचा 6-3, 6-4 असा पराभव करून आपले स्थान निश्चित केले. महिला एकेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या इगा स्विएटेकने जपानच्या एना शिबाराचा 6-0, 6-1 असा पराभव करत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला.

**हॉकी**

आठवी आशिया चषक महिला हॉकी अजिंक्यपद स्पर्धा भारतात होणार आहे. आशियाई हॉकी महासंघाचे अध्यक्ष दातो फ्युमियो ओगुरा यांनी ही घोषणा केली आहे. हॉकी इंडिया आणि बिहार राज्य सरकार संयुक्तपणे याचं आयोजन करत असून बिहारमधल्या राजगीर इथं 11 नोव्हेंबरपासून या स्पर्धेला सुरुवात होईल. बिहार राज्यात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय स्पर्धा होत असल्यानं हा ऐतिहासिक क्षण असल्याचं हॉकी इंडियाचे अध्यक्ष डॉ. दिलीप तिर्की यांनी सांगितलं. 20 नोव्हेंबर पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत भारतासह विद्यमान चीन, जपान, कोरिया, मलेशिया आणि थायलंड संघांचा सहभाग अपेक्षित आहे. गेल्या वर्षी झारखंडमधल्या रांची इथं झालेल्या या स्पर्धेत भारतीय संघ विजयी झाला होता.

**पॅरालिम्पिक**

पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये शीतल देवी आणि राकेश कुमार या भारतीय खेळाडूंनी तिरंदाजी स्पर्धेत 1399 च्या एकत्रित गुणांसह एक नवीन विक्रम केला आहे. आता हे दोन्ही खेळाडू 2 सप्टेंबरला अव्वल मानांकित खेळाडू म्हणून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील. दरम्यान, पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडू आज विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. अवनी लेखरा आणि मोना अग्रवाल महिलांच्या 10 मीटर एअर रायफल पात्रता आणि अंतिम फेरीत सहभागी होईल. तर सुहास यथीराज त्याचा बॅडमिंटनमधील दुसरा सामना खेळणार आहे. याशिवाय ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये आज तीन भारतीय खेळाडू सहभागी होतील.

**गुजरात पाऊस**

गुजरातमधील सौराष्ट्र आणि कच्छवर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचं रूपांतर येत्या 12 तासांत ईशान्य अरबी समुद्रात चक्रीवादळामध्ये होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्यानं वर्तवली आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागानं आज सौराष्ट्र आणि कच्छच्या काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

दरम्यान, गुजरातमध्ये गेल्या 24 तासांत पावसाचा जोर कमी झाला. कच्छ, देवभूमी द्वारका आणि जामनगर वगळता बहुतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. बडोद्यात पूरपरिस्थिती सुधारत असली तरी मदत आणि बचावकार्य अजूनही सुरू आहे. सौराष्ट्र आणि कच्छच्या काही भागात गेल्या 24 तासांत मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या 12 तासांत 12 इंचांपेक्षा जास्त पावसाची नोंद झालेल्या कच्छमधील प्रसिद्ध समुद्रकिनाऱ्यावरील मांडवी शहराला पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे.

पुराच्या पार्श्वभूमीवर कच्छ, देवभूमी द्वारकेसह पूरग्रस्त भागातील शाळा आणि महाविद्यालये बंद राहणार आहेत. पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये मदत आणि बचावकार्य सुरू आहे. गेल्या 24 तासांत 1700 हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. राज्यातील आठशेहून अधिक रस्ते अजूनही बंद आहेत. दरम्यान, गुजरातमधील पूरग्रस्त जिल्ह्यांमध्ये विशेषत: वडोदरा इथं जनजीवन पूर्वपदावर येत आहे. वडोदरा इथला पाणी आणि वीज पुरवठा आजपर्यंत पूर्णपणे सुरळीत होईल, असं प्रशासनानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.